# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्तविभाग

# राष्ट्रीय बातमीपत्र

# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः 23.09.2022** **वारः शुक्रवार**

---

ठळक बातम्या

गुजरातमध्ये आयोजित पर्यावरण मंत्र्यांच्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन आज पंतप्रधानांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे होणार

युक्रेन संघर्ष आंतरराष्ट्रीय समुदायासाठी गंभीर चिंतेचा विषय असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांचं प्रतिपादन

रिझर्व्ह बँकेकडून महाराष्ट्रातल्या लक्ष्मी सहकारी बँकेचा परवाना रद्द

आणि

भारत ऑस्ट्रेलिया दरम्यान 20 षटकांचा दुसरा सामना आज नागपूरमध्ये

**पीएम-पर्यावरण**

गुजरातमध्ये एकता नगर इथं होणाऱ्या पर्यावरण मंत्र्यांच्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे होणार आहे. यावेळी पंतप्रधान सभेला संबोधितही करणार आहेत. बहुआयामी दृष्टीकोनातून प्लास्टिक प्रदुषणाचे उच्चाटन, हवामान बदलाचा प्रभावी सामना करण्यासाठी राज्य कृती योजना या सारख्या मुद्द्यांवर अधिक चांगली धोरणे तयार करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार मध्ये अधिक समन्वय निर्माण करण्यासाठी ही परिषद आयोजित केली जात आहे. वन्यजीव संरक्षण आणि पडीक जमीनीवर पुनर्संचय करणे यावरही यात भर देण्यात येणार आहे. ही परिषद दोन दिवस सुरू राहाणार आहे.

## पीएम पुस्तक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवडक भाषणांचा संग्रह असलेल्या 'सबका साथ, सबका विकास सबका विश्वास - प्राईम मिनिस्टर नरेंद्र मोदी स्पीक्स' या पुस्तकाचे प्रकाशन आज दिल्ली इथल्या आकाशवाणी भवन इथं होणार आहे. या कार्यक्रमाला केरळचे राज्यपाल अरिफ मोहम्मद खान, माजी उपराष्ट्रपती वैंकय्या नायडू तसेच माहिती आणि प्रसारणमंत्री अनुराग ठाकूर उपस्थित राहाणार आहेत. हे पुस्तक हिंदी आणि इंग्रजीतून प्रकाशित होणार असून त्यात आत्मनिर्भर भारत-अर्थव्यवस्था, लोककेन्द्री प्रशासन, कोविड-19 विरुद्ध लढा, उदयोन्मुख भारत-परराष्ट्र व्यवहार, जय किसान, टेक इंडिया-न्यू इंडिया, हरित भारत-स्वच्छ भारत, फिट इंडिया-कार्यक्षम भारत, शाश्वत भारत अशा विविध मुद्द्यांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. आधुनिक भारत, सांस्कृतिक वारसा आणि 'मन की बात' मधील भाषणांचाही यात  समावेश आहे.

## जपान पीएम

जपानचे माजी पंतप्रधान शिन्जो ॲबे यांचा अंत्यविधी येत्या 27 तारखेला जपानची राजधानी टोकियोमध्ये होणार असून पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यासाठी उपस्थित राहाणार आहेत. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची यांनी काल नवी दिल्लीत माध्यमांना ही माहिती दिली. या भेटीदरम्यान पंतप्रधान जपानचे राष्ट्राध्यक्ष फुमिओ किशिदा यांचीही भेट घेणार आहेत.दरम्यान, पत्रकार परिषदेमध्ये  माध्यमकर्मींनी थायलंडविषयी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना बागची म्हणाले की थायलंडमध्ये नोकरीची संधी स्वीकारण्यापुर्वी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे.

## पंतप्रधान केदारनाथ

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बद्रीनाथ आणि केदारनाथ इथं सुरू असलेल्या बांधकामाचा काल दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून आढावा घेतला. तिथल्या कामाच्या प्रगतीविषयी त्यांनी माहिती घेतली. केदारनाथ आणि बद्रीनाथ मधल्या भाविकांची संख्या येत्या काही दिवसात वाढणार आहे, त्यामुळे बद्रीनाथ बरोबर आसपासचा परिसर आदर्श परिसर  म्हणून विकसित करण्याची योजनाही आखली पाहिजे, तर माणगाव आणि आजूबाजूच्या परिसरात ग्रामीण पर्यटनासाठी विकसित करण्याकडेही लक्ष दिले पाहिजे असेही पंतप्रधान यावेळी म्हणाले. बद्रीनाथ आणि केदारनाथ मधील पुनर्बांधणीची कामे

वेगाने सुरू आहेत, पुढील वर्षी डिसेंबरपर्यंत सर्व कामे पूर्ण करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे असं मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यावेळी म्हणाले.

**युक्रेन जयशंकर**

युक्रेन संघर्ष हा आंतरराष्ट्रीय समुदायासाठी गंभीर चिंतेचा विषय असल्याचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी म्हटले आहे. संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेच्या युक्रेनविषयी बैठकीनंतर ते बोलत होते. सध्याची परिस्थिती चिंतेची असून, जागतिकीकरण झालेल्या जगामुळे या परिस्थितीचा परिणाम दूरदूरच्या देशांवर जाणवतो आहे. दोन्ही देशांनी तत्काळ शत्रुत्व संपवावे आणि चर्चा आणि मुत्सद्देगिरीकडे वळावे अशीच भारताची भूमिका आहे असेही जयशंकर म्हणाले. हे युग युद्धाचे असू शकत नाही, शांतता आणि न्याय मिळवण्यासाठी व्यापक प्रयत्न करताना अन्याया विरूद्धचा लढाही महत्त्वाचा आहे. सुरक्षा परिषेदेन यासंदर्भात स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे असं डॉ जयशंकर म्हणाले.

**अमित शहा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आजपासून दोन दिवसांच्या बिहार दौऱ्यावर जाणार आहेत. पूर्णिया आणि किशनगंज इथं ते विविध कार्यक्रमात सहभागी होतील. पूर्णिया इथल्या रंगभूमी मैदानावर जनभावना सभेला शहा संबोधित करणार आहेत.  मुख्यमंत्री नीतिश कुमार यांच्या नेतृत्वाखालच्या जनता दल युनायटेड ने भाजप शी युती  तोडल्यानंतर शहा यांचा हा पहिलाच बिहार दौरा आहे, त्यामुळे या भेटीला महत्त्व आहे.

**सीतारामन**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन कालपासून महाराष्ट्रातील बारामती लोकसभा मतदार संघाच्या दौऱ्यावर आहेत. भारतीय जनता पार्टीच्या लोकसभा प्रवास योजने अंतर्गत आयोजित या दौऱ्यात काल सीतारामन यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. आपल्या दौऱ्याकडे 2024 च्या लोकसभेची पूर्वतयारी म्हणून बघू नये, तर हा दौरा म्हणजे  पक्ष मजबूत करण्यासाठी टाकलेलं पाऊल आहे, असं त्या म्हणाल्या.
आगामी निवडणुकांमध्ये बारामती मतदारसंघात बोगस मतदान होऊ नये यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना दिले.

**फिनटेक**

पंतप्रधान नरेंद्र मोदी ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात देशात 5G सेवा सुरु करणार असल्याचं केंद्रीय दळणवळण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल सांगितलं. मुंबईत आयोजित ग्लोबल फिनटेक महोत्सवात ते बोलत होते. पुढल्या दोन वर्षांमध्ये देशाच्या मोठ्या भागात 5G सेवा घेऊन जाण्यात सरकारला यश मिळेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

**अमेरिका व्याज**

अमेरिकेच्या मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हने काल व्याजदरात वाढ केली. गेल्या पंधरा वर्षातल्या काळातली ही सर्वात मोठी वाढ असल्याचे म्हटलं जात आहे. फेडरल रिझर्व्हने काल त्यांच्या मुख्य व्याजदरामध्ये पाऊण टक्क्याने वाढ कऱण्याची घोषणा केली. फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष जेरोम पॉवेल म्हणाले की, अर्थव्यवस्थेचे दीर्घकालीन नुकसान टाळण्यासाठी व्याज वाढवणं आवश्यक होतं.

**ब्राम्होस**

संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेला गती देण्याच्या उद्देशानं संरक्षण मंत्रालायातर्फे 1 हजार 7 शे कोटी रुपयांच्या ब्राह्मोस क्षेपणास्त्र खरेदीच्या करारावर हस्ताक्षर करण्यात आलं. भारतीय नौदलासाठी ब्राह्मोस एयारोस्पेस प्रायवेट लिमिटेड कडून या क्षेपणास्त्राची खरेदी केली जाईल. जमिनीवरून जमिनीवर मारा करण्याची क्षमता असलेल्या या क्षेपणास्त्रा मुळं स्थानिक उद्योगांना चालना मिळणार आहे.

**लक्ष्मीबँक**

महाराष्ट्रातल्या लक्ष्मी सहकारी बँकेचा परवाना रिझर्व्ह बँकेनं रद्द केला आहे. पुरेसं भांडवल नसल्यामुळे हा परवाना रद्द करण्यात आला आहे. बँक बंद केल्यानंतर प्रत्येक खातेधारकाला पाच लाखांपर्यंत विम्याची रक्कम मिळू शकेल. हे बँक आपल्या खातेधारकांचे पैसे परत देण्यास असमर्थ असल्यामुळे जनहितार्थ हा निर्णय घेत असल्याचं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे. राज्यातल्या सहकारीबँक आयुक्तांनाही या बँकेचा परवाना रद्द करण्याची कारवाई करण्याचे निर्देश देण्यातआले आहेत. दरम्यान,बँकेच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी खातेधारकांना 193 कोटी परत दिले असून बँक सर्वांनात्यांचे पैसे परत देण्यास समर्थ आहे, असं म्हटलं आहे.

**ऱॉजर**

लॉन टेनिसचा बादशहा, 20 वेळा ग्रॅडस्लॅम विजेता रॉजर फेडरर आज त्याचा शेवटचा सामना खेळणार आहे. लंडन मध्ये आजपासून सुरू होणाऱ्या लेवर कप दुहेरी स्पर्धेत फेडरर त्याच्या प्रतिस्पर्धी राफेल नदालच्या साथीने खेळणार आहे. या दोघांचा संघ टीम युरोपचे प्रतिनिधित्व करणार असून टीम वर्ल्ड च्या जॅक सॉक आणि फ्रान्सेस टिआफो यांच्याविरूद्ध ते खेळणार आहेत. या सामन्याआधी अँडी मरे चा एकेरीचा सामना अॅलेक्स मिनौर याच्याशी होणार आहे.

**क्रिकेट**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातला 20 षटकांचा दुसरा क्रिकेट सामना आज नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर होणार आहे. संध्याकाळी सात वाजता हा सामना सुरु होईल. मंगळवारी मोहाली इथं झालेल्या सामन्यात भारतावर पाच गडी राखून मात करत ऑस्ट्रेलियानं या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे.

**उ.प्र पाऊस**

उत्तर प्रदेशच्या पश्चिम भागाला मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे.या भागातल्या बारावी पर्यंतच्या शाळा बंद ठेवण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी काल पूरपरिस्थितीची हवाई पाहणी केली. फिरोजाबाद, अलिगढ कासगंज, बदायून, गौतम बुद्ध नगर आणि हमीरपूर या प्रदेशातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने सामान्य जनजीवन विस्कळीत झाले आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**